ग्रंथमालिका ‘सात्त्विक अक्षरे’ : खंड १

# सात्त्विक देवनागरी अक्षरे आणि अंक लिहिण्याची पद्धत

## (देवनागरी अक्षरे म्हणजे संस्कृत, मराठी अन् हिंदी अक्षरे)

मराठी (Marathi)

विद्येची देवता
श्री शारदादेवी,
तुला माझा नमस्कार !




‘श्री शारदादेवी,
मला विद्या दे’,
ही तुझ्या चरणी प्रार्थना !

सात्त्विक अक्षरनिर्मितीविषयी मार्गदर्शक : हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्घोष करणारे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले

अभ्यासक आणि अक्षररचनाकार : सौ. जान्हवी रमेश शिंदे

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे अद्वितीय कार्य आणि वैशिष्ट्ये यांचा संक्षिप्त परिचय



१. ‘संमोहन उपचारतज्ज्ञ’ म्हणून मुंबईत व्यवसाय (वर्ष १९७८ ते १९९४)

२. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

३. गुरुकुलासम सनातन आश्रमांची निर्मिती !

४. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २५.१.२०२३ पर्यंत १२२ साधक संत झाले, तर १,०८८ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

५. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

६. वाईट शक्तींच्या संदर्भातील संशोधन आणि शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

७. स्वतःचा देह, तसेच वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधनकार्य अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

८. ‘ईश्वरप्राप्तीसाठी कला’ आणि ‘चित्रकला, संगीत, नृत्य आदी कलेचे सात्त्विक सादरीकरण’ यांविषयी संशोधन

९. हिंदु धर्मातील आचारपालनातील कृती आणि धार्मिक कृती, तसेच सूक्ष्म पंचमहाभूतांमुळे घडणाऱ्या बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणे (उदा. ‘युनिव्हर्सल ऑरा स्कॅनर’) अन् तंत्रज्ञान (उदा. ‘पॉलीकॉन्ट्रास्ट इंटरफेरन्स फोटोग्राफी’) यांद्वारे संशोधन

१०. २५.१.२०२३ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २३५ अन् अन्य ९०९ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

११. आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मूल्य असलेल्या सहस्रो वस्तूंचे जतन

१२. स्वभाषारक्षणासाठी दिशादर्शन, भाषेच्या सूक्ष्म पैलूंविषयी संशोधन आणि भाषेच्या वैशिष्ट्यांचा संग्रह

१३. ज्योतिषशास्त्र आणि नाडीभविष्य यांच्याद्वारे विविधांगी संशोधन

१४. हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

१५. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) (टीप) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

(टीप : हिंदु राष्ट्र [ईश्वरी राज्य] - ‘हीनान् गुणान् दूषयति इति हिंदुः ।’ म्हणजे ‘कनिष्ठ, हीन, अशा रज आणि तम गुणांचा नाश करणारे ते हिंदू.’ अशा सात्त्विक लोकांचे राष्ट्र म्हणजे ‘हिंदु राष्ट्र’ होय.)

१६. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी, देशभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे संघटन अन् त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन

१७. भीषण आपत्काळाचा विचार द्रष्टेपणाने अनेक वर्षे आधीच करून आपत्काळात जीवितरक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या विविध उपाययोजनांविषयी ग्रंथ, नियतकालिके, संकेतस्थळे आदींद्वारे मार्गदर्शन

१८. भावी हिंदु राष्ट्राचे दायित्व, तसेच धर्मसत्तेची धुरा सांभाळण्यासाठी पुढील पिढ्यांना सक्षम करणे

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥

– जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## सनातनच्या ‘आदर्श कलारत्न’ सौ. जान्हवी शिंदे !



१. **शिक्षण :** मे २००० मध्ये ‘कमर्शियल आर्टस्’ची पदविका प्राप्त

२. **साधनेला आरंभ :** वयाच्या २३ व्या वर्षी शिक्षण घेत असतांनाच साधनेला आरंभ अन् परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या मार्गदर्शनानुसार सनातनच्या विविध कलाकृती घडवणे चालू

३. **वैशिष्ट्ये :** कलाकृतीतील सूक्ष्म स्पंदने जाणून त्याप्रमाणे ती साकार करण्याची अलौकिक प्रतिभा प्राप्त, तसेच गुरूंच्या मनातील जाणून त्यानुसार त्यांना अपेक्षित अशी सेवा करणे

४. **निर्मिलेल्या विविध कलाकृती :** देवतांची २९ ते ३० टक्के सात्त्विकता असलेली चित्रे आणि सनातनच्या ग्रंथांची मुखपृष्ठे; तसेच सनातन प्रभातची नियतकालिके, प्रसारसाहित्य, रांगोळ्या, मेंदी आदींसाठीच्या कलाकृती. श्रीकृष्णार्जुनाच्या रथारूढ चित्रात त्यातील त्या त्या घटकानुसार भाव, चैतन्य आणि आनंद यांची स्पंदने येणे

५. **राष्ट्रभक्ती आणि धर्मनिष्ठा यांनी भारलेले वैयक्तिक जीवन :** सौ. जान्हवी या हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश हनुमंत शिंदे यांच्या पत्नी असून श्री. शिंदे यांच्या राष्ट्र आणि धर्म यांविषयीच्या कार्याला त्यांचे सदैव प्रोत्साहन असते.

### सौ. जान्हवी शिंदे यांच्यातील तळमळ आणि भाव यांमुळे त्यांनी निर्मिलेली देवनागरी लिपीतील अक्षरे अन् अंक यांच्यामध्ये सरासरी ३१ टक्के एवढी उच्चतम सात्त्विकता येणे !

कलाकाराने त्याच्यातील कौशल्याला भक्तीची जोड दिल्यास त्याची कलाकृती सात्त्विक होते. हाच ‘कलायोग’ ! एखादी कलाकृती तिच्या मूळ तत्त्वाप्रमाणे १०० टक्के साकार करणे म्हणजे सर्वोत्कृष्ट; पण या कलियुगात या सात्त्विकतेचे अधिकतम ३० टक्के एवढेच प्रमाण गाठणे शक्य आहे. मात्र सौ. शिंदे यांनी तळमळ आणि भाव या गुणांनी या ग्रंथातील अक्षरे अन् अंक सरासरी ३१ टक्के सात्त्विक बनवले आहेत. सौ. शिंदे यांच्या साधनेमुळे भगवंताने कलियुगाची मर्यादा ओलांडणारी सत्त्वगुणी अक्षरे आणि अंक यांची ही देणगी अखिल मानवजातीला दिली. ही एक अद्भूत घटना असून सनातनच्या इतिहासातील एक सोनेरी पान आहे !

## साधक-कलाकार सौ. जान्हवी शिंदे यांनी भावोत्कटतेने गुरुंविषयी व्यक्त केलेली कृतज्ञता !

१. **‘माझ्यातील भाव आणि तळमळ यांमुळे कलाकृतीत सात्त्विकता आली’, असे मी म्हणणे हास्यास्पद ! :** एखाद्या कोंबड्याने ‘मी आरवल्यामुळे सूर्य उगवला’, याचा अहं बाळगणे जितके हास्यास्पद आहे, तितकेच ‘माझ्यातील भाव अन् तळमळ यांमुळे कोणत्याही कलाकृतीमध्ये सात्त्विकता निर्माण झाली’, असे मी म्हणणेही हास्यास्पद आहे.

२. **सनातनच्या कलाकृतींतून अनुभूती येणे, हा परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या ज्ञानशक्तीचा परिणाम असणे :** सनातनच्या विविध कलाकृतींमुळे अनेकांना अनुभूती येतात. याचे मुख्य कारण ‘अखिल मानवजातीचे कल्याण आणि साधकांची शीघ्र आध्यात्मिक उन्नती यांसाठीची परात्पर गुरु डॉ. आठवले यांची तीव्र तळमळ’ हेच आहे. या तळमळीमुळे कार्यरत झालेली ज्ञानशक्तीच आज जगभरातील साधकांच्या माध्यमातून धर्मसेवा करवून घेत आहे. रेड्याच्या मुखातूनही वेद वदवून घेणाऱ्या संत ज्ञानेश्वरांच्या उदाहरणातूनही हेच लक्षात येते.

३. **ग्रंथातील अक्षरे आणि अंक यांमध्ये निर्माण झालेली सात्त्विकता हे जगदोद्धारक परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या कृपेमुळे घडणे :** थोडक्यात आज या ग्रंथातील अक्षरे आणि अंक यांमध्ये कलियुगातील मर्यादेच्या पलीकडे जाऊन सात्त्विकता निर्माण होणे, हे माझ्यामुळे नव्हे, तर ती जगदोद्धाराची सर्वोच्च तळमळ असलेल्या परात्पर गुरु डॉ. आठवले यांचीच कृपा आहे. ते स्वतः ‘हें मजचिस्तव जाहलें । परि म्यां नाहीं केलें ।’ (‘हे माझ्यामुळे झाले; पण मी केले नाही’), या परमोच्च आध्यात्मिक स्थितीला असल्याने त्यांच्या मार्गदर्शनाखाली सेवारत असलेल्या माझ्यासारख्या अनेक जिवांच्या उद्धारासाठी ते त्यांची स्तुती करण्याची शब्दलीला करत असतात.

४. **कलाकृतीत जे चांगले ते गुरूंचे आणि चुका त्या माझ्या असणे :** कलाकाराने ईश्वराच्या हातात कुंचल्याप्रमाणे पडून रहायचे असते. माझ्याकडून ठरवून झालेले प्रयत्न, हीसुद्धा त्या कनवाळू परात्पर गुरूंचीच कृपा होय. या प्रयत्नांत सातत्य राखण्यातही मी अल्प पडले. त्यामुळे या कलाकृतींमध्ये जे जमले, ती गुरुकृपा होती, तर जे जमले नाही, ते माझ्यातील अहं अन् दोष यांचा दुष्परिणाम होय.

**५. स्पंदनशास्त्र शिकवून माझ्या उद्धारासाठी परात्पर गुरूंनी सुनियोजन केलेले असणे :** प्रत्येक कलाकृतीच्या प्रत्येक टप्प्याला कोणते प्रयोग करायचे ? स्पंदने कशी ओळखायची ? ती कशामुळे पालटू शकतात ? आदींविषयी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मार्गदर्शन करून या जिवाच्या (माझ्या) उद्धारासाठीच परात्पर गुरूंनी सुनियोजन केले आहे. त्यामुळेच एका सामान्य आध्यात्मिक पातळीच्या कलाकार-साधिकेला चैतन्य, आनंद, शांती यांसारख्या निर्गुण स्पंदनांची अनुभूती घेता आली.



हे गुरुमाऊली, अहं-दोषाने लिप्त अशा या जिवाकडून तुम्ही धर्मकार्य करवून घेत आहात, याविषयी अनंत कोटी कृतज्ञता ! आपल्या या कृपेची जाणीव माझ्या अंतरात अखंड जागृत राहो, ही प्रार्थना ! F (21A-JRS + AY + IKC + AY-Bal + PR 5AKrD)

प.पू. गुरुदेवांची चरणरज,

सौ. जान्हवी रमेश शिंदे

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या 'सच्चिदानंद परब्रह्म' या उपाधीविषयी विवेचन !

'१३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये 'प.पू.' आणि 'परात्पर गुरु' या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर अन् ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

---

## सनातनच्या दोन सद्गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

नाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ' आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ' असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.



## मुलाकडून अक्षरे गिरवतांनाच त्याच्यावर चांगले हस्ताक्षर काढण्याचा सुसंस्कार करा !

'आपल्या पाल्याचे अक्षर रेखीव, वळणदार आणि सुंदर असावे', असे सर्वच पालकांना वाटते. हे प्रत्यक्षात येण्यासाठी त्यांनी आपले मूल जेव्हा अ, आ, इ, ई.... लिहायला शिकते, तेव्हाच प्रयत्न करायला हवेत. त्याच्याकडून अक्षरे गिरवतांना त्याला तशी सवय लावायला हवी; कारण हा पाया भक्कम झाल्याविना त्याला पुढे चांगले हस्ताक्षर काढायचे वळण लागणार नाही आणि त्याच्यावर तो सुसंस्कार होणार नाही.

## कलात्मक दृष्टीने काढलेले अक्षर आणि सात्त्विक अक्षर यांतील भेद समजून घ्या !

काही लोकांचे अक्षर दिसायला चांगले दिसते; पण ते केवळ कलेच्या दृष्टीने चांगले असते. त्यात सात्त्विकता असतेच असे नाही. पेठेत (बाजारात) मिळणाऱ्या अक्षरे गिरवण्याच्या पुस्तकांत अक्षरांचे निरनिराळे आकार असतात, तसेच संगणकात मराठी अक्षरांच्या लिपीचे अनेक प्रकार पहायला मिळतात; पण ते सर्वच सात्त्विक असतात असे नाही. अक्षरांतून अधिकाधिक चांगली स्पंदने येण्यासाठी त्यांचा आकार नेमका कसा असावा ? यावर सनातन संस्था गेली काही वर्षे संशोधन करत आहे.

आपल्या मुलाकडून चांगल्या अक्षराची अपेक्षा करणाऱ्या पालकांनी प्रथम 'सात्त्विक अक्षर म्हणजे काय ?', हे समजून घेतले पाहिजे. प्रत्येक अक्षराला एक ठराविक रूप असते. जसे 'आंबा' म्हटले की, त्याचे विशिष्ट रूप डोळ्यासमोर येते, तसेच ते आहे. प्रत्येक अक्षर त्याच्या रूपाप्रमाणे काढणे, म्हणजे सात्त्विक अक्षर काढणे. रूप हे पंचतत्त्वांपैकी तेजतत्त्वाशी संबंधित आहे. प्रत्येक अक्षराचा जसा आकार आहे, तसाच तो काढल्याने लिखाण करणाऱ्याला अन् ते वाचणाऱ्यालाही त्या अक्षरातून तेजतत्त्व, म्हणजे चैतन्य मिळते; म्हणजे ते सात्त्विक असते. याउलट कसेही काढलेल्या अक्षरातून त्रासदायक शक्ती मिळते; म्हणजे ते

तामसिक असते. याकरताच मुलांकडून सात्त्विक अक्षरे गिरवून घेणे महत्त्वाचे आहे. या ग्रंथाचा उद्देश हाच आहे. त्यासाठी ग्रंथातील पुसट अक्षरे गिरवून घ्यावीत.

## ग्रंथात दिलेली अक्षरे अन् अंक हे 'लिखित सात्त्विक अक्षरे अन् अंक', असणे

या ग्रंथात दिलेली अक्षरे त्यांच्या मूळ रूपाप्रमाणे देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी सूक्ष्मातील जाणण्याचा उपयोग करून घेतला आहे. अक्षरांना जसे रूप असते, तसे त्यांचा ठराविक उच्चारही असतो. त्या उच्चारांप्रमाणे अक्षरे काढणे, हे आणखी सूक्ष्म आहे. या ग्रंथात काढलेली अक्षरे ही त्यांच्या रूपाप्रमाणे आहेत; म्हणून ती 'लिखित सात्त्विक अक्षरे', आहेत. हेच मुलांसाठी ग्रंथात दिलेल्या १ ते ९ अंकांसाठीही लागू आहे.

## सात्त्विक अक्षर काढणे, हा 'अक्षरयोग' असणे

साधना करणे म्हणजे जीव आणि शिव यांचे मीलन घडवून आणणे असते; म्हणून साधनेला 'योग', असे म्हणतात. सात्त्विक अक्षर काढणे, हाही एक प्रकारे योगच आहे; कारण त्यामध्ये देवतेचे तत्त्व आकर्षित करण्याची क्षमता आहे; म्हणून आम्ही सात्त्विक अक्षरांच्या निर्मितीला 'अक्षरयोग', असे म्हटले आहे.

## अक्षरे अधिकाधिक सात्त्विक व्हावीत, यासाठी केलेले काही प्रयत्न

अक्षरे काढण्याची एक दिशा असते. अक्षर डावीकडून उजवीकडे काढावे आणि नंतर त्यावर आडवी रेष काढावी. अशा अक्षरातून भाव जाणवतो आणि अक्षर उलट काढल्यास ते त्रासदायक वाटते, उदा. 'ए' या अक्षराची दुसरी दांडी आधी काढून नंतर पहिली लांब दांडी काढल्यास आपल्याला त्रासदायक वाटते. तसेच 'ग' या अक्षरात आधीच्या वक्र आकारावरून पेन्सिल फिरवल्यास चांगले अथवा वाईट असे काही वाटत नाही, तर नंतरच्या दांड्यावरून आणि शेवटी अक्षरावरील आडव्या रेषेवरून पेन्सिल फिरवल्यास चांगले वाटते. ही प्रक्रिया उलट केल्यास चांगले वाटत नाही. अक्षर कसे काढावे, हे कळण्यासाठी पानाच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात अक्षर काढायचे टप्पे दिले आहेत. तेही गिरवावेत.



काही अक्षरांमध्ये त्यांतील वळणामुळे गोलाकार निर्माण होतो, उदा. ठ, व, ळ इत्यादी अक्षरे. गोलांमुळे त्या अक्षरांत पोकळी निर्माण होते. पोकळी ही पंचतत्त्वांतील उच्चतम अशा आकाशतत्त्वाशी संबंधित आहे. गोल न दिसणाऱ्या ग, म अशा अक्षरांत अक्षराच्या आकाराला योग्य दिसेल असा गोलाचा आकार घेतला आहे. त्यामुळे लहान आकाराच्या अक्षरांमध्ये तो गोल दिसला नाही, तरीही चांगली स्पंदने जाणवतात. तसेच या अक्षरांमध्ये सोयीनुसार एक तडजोडही केली आहे. गोलाकार असणारी अक्षरे मुलांना नीट गिरवता यावीत, यासाठी त्या अक्षरांमधील गोल त्यांच्या मूळ सात्त्विक अक्षरांतील गोलांच्या आकारापेक्षा थोडा मोठा केला आहे.

अक्षरे आणि अंक सिद्ध करतांना त्यांची लांबी आणि रूंदी यांबरोबरच त्याच्या जाडीलाही तिकतेच महत्त्व आहे. या तिन्ही गोष्टींचा योग्य ताळमेळ साधला की, अक्षर किंवा अंक सात्त्विक होतात.

सात्त्विक अक्षरे बनवतांना आरंभी प्रत्येक अक्षर एक एक करून पडताळत होतो. नंतर 'ते इतर अक्षरांच्या तुलनेत पहायला हवे', असे सुचले. तेव्हा प्रत्येक अक्षर एखाद्या रूंद किंवा अरूंद अक्षराच्या तुलनेत पाहिले. त्यामुळे आधी अंतिम केलेल्या सर्वच अक्षरांमध्ये पालट करावा लागला.

सात्त्विक अक्षरे सिद्ध (तयार) करतांना आणखी एक गोष्ट अशी लक्षात आली की, प्रत्येक अक्षर हे तारक आणि मारक अशा दोन प्रकारे काढता येईल, उदा. 'र' या अक्षराची खालची दांडी वक्र काढल्यास त्याचे तारक रूप, तर सरळ काढल्यास त्याचे मारक रूप सिद्ध होते. विषयानुसार आपण अक्षराचे तारक किंवा मारक रूप घेऊ शकतो, उदा. साधनेविषयीच्या सात्त्विक मजकुरात अक्षराचे तारक रूप, तर राष्ट्रासंदर्भातील क्षात्रतेजयुक्त विषयामध्ये अक्षराचे मारक रूप घेऊ शकतो.

अशा प्रकारे सात्त्विक अक्षरांच्या निर्मितीविषयी, तसेच अंकांविषयीही बारीकसारीक विचार ग्रंथात करण्यात आला आहे. या प्रयत्नांमुळे ईश्वरकृपेने या ग्रंथात दिलेली अक्षरे आणि अंक यांत सात्त्विकता सरासरी ३१ टक्के निर्माण झाली आहे. सध्याच्या काळात अक्षरे आणि अंक यांत अधिकाधिक ३० - ३१ टक्के सात्त्विकता आणणे शक्य आहे.

## धर्मशिक्षण देणारे आणि सुसंस्कार करणारे अक्षरांशी निगडित शब्द आणि शब्दांशी निगडित वाक्ये !

मुलांना प्रत्येक अक्षराचा बोध होण्यासाठी त्या अक्षराविषयीचा शब्द देतांना कोणताही शब्द न देता त्यातून धर्मशिक्षण मिळेल आणि मुलांवर सुसंस्कार होतील असे शब्द निवडले आहेत, उदा. ‘ख – खटारा’, ‘ग – गाढव’, ‘च – चमचा’, ‘द – दौत’, ‘न – नळ’ असे शब्द न देता ‘ख – खडावा’, ‘ग – गणपति’, ‘च – चरण’, ‘द – दत्त’, ‘न – नमस्कार’ असे शब्द दिले आहेत, तसेच त्या शब्दांची दिलेली वाक्येही बोधकारक आहेत, उदा. ‘चरण’ या शब्दासाठी ‘श्रीगुरूंच्या चरणांवर डोके ठेवून नमस्कार करावा’, हे वाक्य दिले आहे. यामुळे ‘केवळ शिक्षणासाठी नव्हे, तर सुसंस्कारांसाठी मुळाक्षरे’ हे ब्रीद समाजात रुजेल.

## सात्त्विक अक्षरे आणि अंक निर्माण करतांना आलेल्या अनुभूती

सात्त्विक अक्षरे निर्माण करतांना आसुरी शक्तींनी अडथळेही आणले. सुधारणा केलेले अक्षर आणि आधीचे अक्षर यांत अधिक चांगले कोणते, हे ठरवण्यात संभ्रम होत असे. आसुरी शक्तींना सात्त्विक अक्षरे बनवणे नको असल्याने त्या असे त्रास देत असत. हे त्रास झाले, तशा चांगल्या अनुभूतीही आल्या, उदा. सुधारणा केलेल्या अंकाच्या भोवती आधीच्या अंकाच्या तुलनेत जास्त प्रकाश दिसायचा.

## प्रार्थना

या ग्रंथामुळे पालक आणि शिक्षक यांना मुलांवर सात्त्विक संस्कार करणे सोपे होणार आहे. मोठ्यांनीही आपल्या अक्षराला वळण लावायला हरकत नाही. अक्षरयोगाची अनुभूती देणारी सात्त्विक अक्षरे काढण्याची पद्धत शिकवणे, हा या ग्रंथाचा उद्देश आहे. ‘हा उद्देश सफल व्हावा, ही श्रीगुरु आणि श्री सरस्वतीदेवी यांच्या चरणी प्रार्थना !’ – **संकलक**

**टीप** – या ग्रंथात मुलांसाठी सात्त्विक अक्षरे अन् अंक दिले असले, तरी त्यांची अजून संगणकीय लिपी सिद्ध व्हायची असल्याने या ग्रंथाच्या लिखाणातील अक्षरे ही सनातन-निर्मित सात्त्विक अक्षरे नाहीत, याची नोंद घ्यावी.

## अक्षरावरील आडवी रेष अर्धवट असलेला ‘अ’ आणि अक्षरावरील आडवी रेष पूर्ण असलेला ‘अ’ यांकडे पाहून काय जाणवते ?, याचा प्रयोग करणे

१. **प्रयोग :** ‘अक्षरावरील आडवी रेष अर्धवट असलेला ‘अ’ आणि अक्षरावरील आडवी रेष पूर्ण असलेला ‘अ’ यांकडे पाहिल्यावर काय जाणवते ?, याचा अभ्यास १ – २ मिनिटे करा आणि नंतर पुढील उत्तर वाचा.

अ    अ

२. **प्रयोगाचे उत्तर :** अक्षरावरील आडवी रेष अर्धवट असलेल्या ‘अ’च्या तुलनेत अक्षरावरील आडवी रेष पूर्ण असलेल्या ‘अ’कडे पाहून चांगले वाटते.

३. **विश्लेषण :** अक्षरावरील आडवी रेष पूर्ण असलेला ‘अ’ हा मूळ देवनागरी अक्षरानुसार, तसेच स्पंदनशास्त्राच्या अभ्यासानुसार आहे. त्यानुसार अक्षर हे अक्षरावरील आडव्या रेषेने पूर्ण झाकले गेले पाहिजे. असे अक्षर सात्त्विक दिसते. त्याकडे पाहून हलके वाटते. याउलट अक्षरावरील आडवी रेष अर्धवट असलेल्या ‘अ’कडे पाहून जडपणा जाणवतो. ते अक्षर संगणकीय लिपीतील आहे. छापील माध्यमांमध्ये लहान आकारांत अक्षरे योग्य दिसण्यासाठी जे पालट केले गेले, तेच समाजाकडूनही अंगीकारले गेले. लहान मुलांना ज्या पुस्तकांच्या माध्यमांतून अक्षरांची प्राथमिक ओळख होते, ती अक्षरे संगणकीय लिपीतील असल्यामुळे मुलांना सुरुवातीपासूनच अयोग्य वळणाची अक्षरे शिकवली जातात. आपल्याला हे पालटायचे आहे. संगणकीय लिपीतील अक्षरावरील आडवी रेष अर्धवट असलेली अन्य अक्षरे म्हणजे आ, ओ, औ, अं, अः, श्र, थ, ध, भ आणि क्ष ही अक्षरे. या ग्रंथात ही अक्षरे मूळ देवनागरी लिपीनुसार दिली आहेत.’

– सौ. जान्हवी शिंदे, सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. F (AY-Bal + SP-AY)